स्थापना : दि. ५ मे २००८
नों.क्र.महा./२४९२९/को./११/०७/०८

॥ सामर्थ्य मायमराठीचं ॥
॥ विकसन MY चालीचं ॥

## शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

शब्दगंध, १२२–अ,प्लॉट नं. ३/ब,नृसिंह कॉलनी, गंगाई लॉनच्यामागे, फुलेवाडी रिंगरोड, कोल्हापूर
४१६०१०

आणि

## सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज

ता. कराड, जि. सातारा, पिन – ४१५१०९

या संस्थातील

# सामंजस्य करार

MEMORANDUM OF UNDERSTANDING

दिनांक १५ एप्रिल २०२१

Scanned by CamScanner

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2020 ◐ XP 866900

जोडपत्र १ व २ /Annexure-I & II

मुद्रांक विक्री कारण- Reason of sale stamps and Amount: करारनामा रक्कम १००/-

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव व पत्ता- Stamp Purchasers Name: Principal, Sou.Mangaltai Ramchandra Jagtap Mahila Mahavidyalaya,Umbraj Tal.Karad, Dist.Satara

हस्ते असल्यास त्यांचे नाव व पत्ता Stamp Purchasers Name: राजेंद्र कांबळे

मुद्रांक विक्री नोंदवही नंबर Serial No and Date: दिनांक 23/3/2021

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही Stamp Purchasers Sign.

मुद्रांक विक्रेता-सौ. रुपाली कमलेश दळवी
परवाना क्रं.२३०१०३९ मु.वि.ठिकाण-दु. नि. कार्यालय उंब्रज

मुद्रांक विक्रेत्याची सही

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

SUB. TREASURY OFFICE KARAD
15 MAR 2021
SUB TREASURY OFFICER KARAD

स्थापना : दि. ५ मे २००८
नों.क्र.महा./२४९२१/को./११/०७/०८
शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर
शिविमशिसं
मराठी
॥ मायमराठी जपूया ॥

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

आणि

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज

ता. कराड जि. सातारा–पिन–४१५१०९

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ,कोल्हापूर हे विद्यापीठीय मराठी शिक्षक आणि महाराष्ट्रातील साहित्य आणि भाषाप्रेमी यांचे संघटन आहे. मराठी भाषा,

Scanned by CamScanner

साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन आणि विकास करणे तसेच संशोधन करणे हे संघाचे ध्येय आहे. मराठी शिक्षकांच्या दर्जेदार अध्यापनासाठी ज्ञानप्रसार आणि संशोधन या संदर्भात विविध उपक्रम राबविले जातात. त्यानुसार विविध विषयांवर राष्ट्रीय चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळेचे आयोजन केले जाते. विविध महाविद्यालयातील चर्चासत्रे तसेच कार्यशाळांमध्ये बौध्दिक सहयोगी होऊन सहकार्य केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेचे आणि साहित्याचे विकसन करण्याच्या दृष्टीने निबंधलेखन,कथालेखन,काव्यलेखन,कथाकथन,काव्यवाचन अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. तसेच मराठी प्राध्यापकांच्या शोधनिबंधांना पारितोषिके, ललित, ललितेतर, संपादीत ग्रंथांना पारितोषिके दिले जाते. संघामार्फत 'शिविम संशोधन पत्रिका' हे विद्वत्प्रमाणित (Pear Reviewed Research Journal) त्रैमासिक प्रसिध्द केले जाते. त्याचा ISSN No.2319-6025 असून शिवाजी विद्यापीठ आणि यु.जी.सी. मान्यताप्राप्त यादीमध्ये पत्रिकेचा समावेश केलेला आहे.

वरील नमुद केलेल्या शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ आणि सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय,उंब्रज ता. कराड, जि. सातारा पिन–४१५१०९ या संस्था एकमेकाबरोबर सामंजस्य करार दिनांक दिनांक १५ एप्रिल २०२१ रोजी करत आहेत. या कराराची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

**उद्दिष्टे**

१. मराठी भाषा,साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन आणि विकास करणे आणि विविध विषयावर संशोधन प्रकल्प राबविणे.

२. चर्चासत्र,कार्यशाळा, परिसंवाद, काव्यसंमेलन, साहित्यसंमेलन, संयुक्त बैठका यांचे आयोजन करणे.

३. विद्यापीठीय अभ्यासक्रम, प्रमाणपत्र, पदविका कोर्ससाठी सहयोग करणे.

Scanned by CamScanner

४. निबंध, वक्तृत्व, वाद विवाद, प्रश्नमंजुषा, कथालेखन, काव्यलेखन, काव्यवाचन, कथाकथन स्पर्धांचे आयोजन करणे.

५. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी सहकार्य करणे.

६. व्यक्तिमत्व विकास प्रकल्प राबविणे

७. दरवर्षी कोल्हापूर, सांगली, सातारा या शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये संघाचे वार्षिक एक/दोन दिवसांचे अधिवेशन विविध साहित्यिक विषयांवर घेणे. सदर अधिवेषनात प्राध्यापकांच्या शैक्षणिक तसेच मराठी विषयाच्या समस्यांवर चर्चा करणे.

८. सर्जनशील लेखन, उपयोजित मराठी लेखन प्रकल्प राबविणे.

९. मोडी लिपी, मुद्रितशोधन, पत्रिका इत्यादी अभ्यासक्रमांचे आयोजन करणे.

१०. ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी सहकार्य करणे. ग्रंथाचे प्रकाशन व चर्चा घडवून आणणे.

११. मराठी भाषा,साहित्य आणि संस्कृती या संबंधाने येणा—या समस्या व अडचणी विद्यापीठ, शासन आणि विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली यांना या संदर्भात पत्रव्यवहार करणे

**.एकमेकांना सहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे**

१. परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये तसेच प्रशिक्षणामध्ये सहकार्य करणे.

२. विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे.

३. उपलब्ध साधनसामुग्रीनुसार या संस्थाकडून एक निश्चित योजना तयार करणे.

४. त्रैमासिकाव्दारे साहित्य, विचार यांची देवाणघेवाण करणे.

Scanned by CamScanner

५. दरवर्षी संघाचे अधिवेशन विविध कॉलेजवर आयोजित करून विचारविनिमय करणे.

६. शासन, साहित्य अकादमी, मराठी साहित्य व संस्कृती महामंडळ, राज्य मराठी विकास संस्था यांचे उपक्रम सौजन्याने राबविणे.

## अटी

१. आपआपल्या खर्चाने एकमेकांना सहकार्य करणे.

२. परस्पर सामंजस्य करारातील उदाहरणांचे नुतनीकरण करणे आणि परस्परांच्या लेखी करारांची कोणत्याही क्षणी समाप्ती केली जाऊ शकते. साठ दिवसांच्या पूर्व लेखी सूचनेनुसार दोन्हीपैकी कोणत्याही संस्थेला करार संपुष्टात आणता येईल.

३. कोणत्याही महाविद्यालयास प्रवास व भोजन भत्ता देणे बंधनकारक नाही.

४. सदर परस्पर सामंजस्य कराराचा कालावधी पाच वर्षानंतर संपुष्ठात येईल.

५. परस्पर सहमतीने आणखी पाच वर्षासाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल.

६. यासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता बंधनकारक असेल.

Scanned by CamScanner

समन्वय

१ . सदर कराराची जबाबदारी, समन्वय आणि अंमलबजावणीसाठी शिक्षक संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव कार्यरत राहतील . तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, विभागप्रमुख आणि समन्वयक काम करतील.

२. सदर सामंजस्य करार कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटीशी अधीन राहून दोन प्रतीमध्ये अंमलात येत आहे.

३. खालील स्वाक्ष—यांचा सदरहू परस्पर सामंजस्य कारार हा पुढील समन्वयिक अधिका—यांत होत आहे, तसेच वर नमुद केलेल्या दिनांक व वर्षानुसार अंमलात येत आहे.

| प्रा. डॉ. उमाप ए. एस. | डॉ. संजय कांबळे | डॉ. रमेश साळुंखे | डॉ. प्रकाश दुकळे |
|---|---|---|---|
| *मराठी विभाग प्रमुख* | *प्राचार्य* | *सचिव* | *अध्यक्ष* |

*सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज* *शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर*